३०३

# महाराष्ट्र शासन

## संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य.

कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४

☎/🖷 022,27571391 website www.mahalfa.in E.Mail: ad.report @mahalfa.in

क्र.स्था.१८/ब/अधिनियम सुधारणा/राजपत्र ३-४-२०११/अेअेर/१९२३ दिनांक:- 24 OCT 2011

प्रति,

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
---------सर्व ------------

**विषय :- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३/४/२०११ अन्वये मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मध्ये केलेल्या सुधारणा.**
**संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३/४/२०११.**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३/४/२०११ अन्वये मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मध्ये केलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे.

| मुख्य अधिनियमाचा कलम क्रमांक | सुधारणेचा अनुक्रमांक | सुधारणा |
|---|---|---|
| १ | १ | या अधिनियमास मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ म्हणावे असे निर्देशित करण्यात आले आहे. |
| | २ व ३ | बृहन्मुंबई व्यतिरिक्त हा मजकुर वगळण्यात आला आहे. |
| | ४ | ''मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०'' या मजकुराऐवजी ''महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम'' हा मजकुर दाखल करण्यात आला आहे. |
| २ | ५ | बृहन्मुंबई व्यतिरिक्त हा मजकुर वगळण्यात आला आहे. |
| ३ | ६ | (क) पोटकलम (१) मध्ये (एक) खंड (अ) मधील मुख्य लेखापरीक्षक या मजकुराऐवजी संचालक हा मजकुर दाखल करण्यात आला आहे.<br>(दोन) खंड (अअ) मध्ये, ''नागपुर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत त्या शहराचा नगरपालिका आयुक्त,'' या मजकुराऐवजी, ''महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींच्या बाबतीत, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठीत झालेल्या संबंधित नगरपरिषदा किंवा यथास्थिती, नगरपंचायतींचा मुख्याधिकारी आणि औद्योगिक नगरींच्याबाबतीत संबंधित औद्योगिक नगरींचा मुख्य कार्यकारी अधिकारी'' हा मजकुर दाखल करण्यात आला आहे.<br>(तीन) खंड (अअअ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात आला आहे :-<br>''(अअअ) ''संचालक'' म्हणजे संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा असा असून त्यात सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, उप संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा आणि सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांचा समावेश होतो. '' |